स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत
इतिहास विषयातील विद्या- वाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर
करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

“बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास”

-: संशोधक :-

घोगरे जयपाल विश्वनाथ

(‹´Ö.‹.,²Öß.‹›.,‹´Ö.×±ü»Ö.)

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.विजया खूलासराव साखरे

(‹´Ö.‹.,‹´Ö.‹›.,‹´Ö.×±ü»Ö, ¯Öß‹“Ö.›ß.)

पदव्युत्तर इतिहास विभाग

श्री. शिवाजी कॉलेज कंधार

जि.नांदेड

´ÖÖ“Ö - 2016

“बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास”

प्रस्तावना :-

भारत हा भुखंडाच्या दृष्टीकोनातून विविधतेने नटलेला आहे. तसाच तो एकतेच्या तत्वाने बांधला गेलेला आहे. या देशातील कांही स्थळे मनामध्ये भरणारी आहेत. तर कांही मनाला रुक्ष करुन टाकणारी आहेत. म्हणून की काय या रुक्ष स्थळांना कांहीच किंमत नसावी. ही रुक्ष स्थळेसुध्दा निसर्गाचीच देण आहेत. त्यांनाही आपले स्वत:चे सौंदर्य आहे. निसर्गनिर्मित स्थळाबरोबर मानवानेही अनेक स्थळांचा, ठिकाणांचा वैविध्यपुर्ण विकास केला आहे. त्या काळातील मानवांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा, परिस्थितीचा, समाजाचा आणि अर्थव्यवस्थेत उल्लेखणीय ठरावी अशीच स्थळे आहेत.

भारतीय इतिहासाच्या अभ्यास केला असता भारतीय इतिहास व संस्कृती ही जगातील प्राचीन इतिहास व प्राचीन संस्कृतीमध्ये गणली जाते. प्राचीन काळापासून भारतीयांना लाभलेला वारसा आजही निवडक स्थळांच्या रुपाने साक्षीदार आहे. त्यामध्ये अनेक लिखित साधने निर्माण झाली तशीच नष्टही झाली. पण आमचे वैभव, संस्कृती हा वारसा जपून त्याला उजाळा देण्याचे कार्य निवडक स्थळांच्या रुपाने निर्भिडपणे करुन भारतीय इतिहास व संस्कृतीचे दर्शन घडवत आहे.

भारतातीलच एक प्रमुख घटकराज्य म्हणून ज्याकडे पाहिले जाते. तो म्हणजे महाराष्ट्र होय. महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या विविध वेगवेगळ्या प्रशासकीय विभागातील “मराठवाडा हा एक प्रशासकीय विभाग आहे.” महाराष्ट्राच्या वैभवामध्ये भर टाकणारा औरंगाबाद एक आगळावेगळा महत्वपुर्ण असा विभाग आहे. या विभागामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर आणि बीड या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. यापैकीच बीड हा जिल्हा ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने महत्वाचा आहे. या जिल्हयालाच ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणूनही ओळखले जाते. बीड जिल्ह्याला कलास्थापत्य व सांस्कृतिक वारसाच्या बाबतीत ऐतिहासिक महत्व आहे. तसेच राजकीय बाबतीत विचार करता या जिल्ह्याच्या भुभागावर अनेक राजघराण्यांनी प्राचीन काळापासून राज्य केलेले आहे. तसेच अनेक परकीय प्रवाशांनीही बीडच्या भुभागाचा उल्लेख केलेला आढळतो. त्यामध्ये ग्रीक इतिहासकारांनी कुंथलाचा उल्लेख “गोंडालाई” असा केला आहे. या भुभागवर राज्य करणाऱ्या वंशामध्ये सातवहान, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, तुघलक, मोगल व निजाम यांनी राज्य केले आहे. बीड जिल्ह्यातील धर्मापुरी हे ठिकाण चालुक्यांच्या धार्मिक राजधानीचे होते तर अंबानगरी व परळी ही ठिकाणे यादवांच्या उपराजधानीची होती. धारुर हे शहर राष्ट्रकुटांचे शहर म्हणून ओळखले जाते. तर आष्टी पाटोद्याला मध्ययुगातील संतांची भूमी म्हणून ओळखतात. परमार- चालुक्यांची युध्दभूमी म्हणून गेवराईचा उल्लेख करता येतो. तर माजलगाव हे यादवकालीन घडामोडीचा प्रदेश म्हणून ओळखले जाते.

बीड जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळामध्ये कंकालेश्वर मंदिर, युवाशांतीवन, नामलगाव, नवगणराजुरी, खजाना बावडी, खंडोबा मंदिर व दिपमाळ परिसर शहावली दर्गा, ज्ञानेश्वर माऊली समाधी, योगेश्वरी मंदिर, हत्तीखाना, धारुरचा किल्ला, परळी वैजनाथ मंदिर, शनिमंदिर, सौताडा अभयआरण्य, रामेश्वर मंदिर, पुरुषोत्तमपुरी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, केदारेश्वर मंदिर, कपिलधार, बंकट स्वामी, अश्वलिंग मंदिर, गहिनीनाथगड, मच्छिंद्रनाथगड, नागनाथ मंदिर (मनुश्कर), गोरक्षनाथ मंदिर, श्रीक्षेत्र नारायणगड, मुकुंदराज स्वामी मंदिर, दासोपंथ समाधी इत्यादी स्थळे आहेत. या जिल्ह्याच्या अनेक ठिकाणी प्राचीन मंदिरे, गढी, वाडे, शिल्पकला, वास्तुकला व अनेक कलेचे नमुने आजही पहावयास मिळतात.

बीड जिल्ह्याला वेगवेगळ्या नावाने संबोधलेले दिसुन येते. त्या नावामध्ये दुर्गावती, ब्राम्हणी, चंपावती, अस्मक, भीर आणि या भीरचाच अपभ्रंश होऊन बीड हे आजचे प्रचलित नाव रुढ झाले आहे.

बीड या जिल्हयातील निवडक स्थळी हिंदू, जैन, बौध्द, ख्रिश्चन, शीव इत्यादी संस्कृतीच्या पाऊलखुणा आढळून येतात. त्यामध्ये किल्ले हे महत्वपुर्ण आहेत. किल्ल्यामध्ये डोंगरी किल्ले व भोईकोट किल्ले आढळून येतात. तर स्थापत्यामध्ये हा जिल्हा अग्रेसर आहे. त्यामध्ये शिल्पकला हा कलेचा उत्कृष्ट नमुना असून तो पुरावशेषांच्या रुपाने बीड जिल्ह्याचा वारसा ठरलेला आहे. या जिल्ह्यातील निवडक स्थळावर योग्य असा प्रकाश न पडल्याने काळाच्य ओघात मागे पडत असल्याने यावर शास्त्रीय दृष्टीने योग्य असे संशोधन होणे गरजचे आहे.

संशोधन विषयाचे महत्व :-

बीड जिल्ह्यास प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभला आहे. वास्तुकला, शिल्पकला हा वारसा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टीने महत्वाचा आहे. परंतू हा वारसा आजतागायत म्हणावा तेवढा प्रकाशात आलेला नाही. याच्या प्रकाशात येण्याने प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत बीड जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व कलात्मक बाबीमध्ये भर पडणार आहे. म्हणून **स.मा.गर्गे** यांनी म्हटल्याप्रमाणे “†¬ÖÖ¸ †ÃÖ»Ö ŸÖ£Ö ²Ö™¸ß ´ÖÖ¸Ö” म्हणून बीड जिल्ह्यातील निवडक व महत्वपुर्ण स्थळांचा अभ्यास महत्वाचा ठरतो. या विषयाला प्रकाशात आणून त्याचे दर्शन आजच्या समाजाला करण्याची आवश्यकता आहे. म्हणून या दुर्लक्षित विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

या जिल्ह्यात विविध प्रकारच्या वस्तु व वास्तु यामध्ये गढी, वाडे, बारव, विहीर, किल्ले, मंदिरे, शिल्प, गुहामंदिरे अशी पुरातणीय सामुग्री आहे. त्यात धारुरचा किल्ला, धर्मापुरीचा किल्ला व शिल्पस्थापत्य आढळून येते. कांही पुरातत्वीय साधने काळानुसार नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणून या पुरातत्वाचा अभ्यास महत्वाचा आहे. हजारो वर्षाचा हा वारसा जतन करण्यासाठी व संवर्धनासाठी या जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनातून बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास या विषयाची निवड केली आहे.

3...

समस्या सुत्रण :-

कॉपर या तत्वाज्ञाच्या म्हणण्याप्रमाणे “आपण कुठल्याही विद्याशाखेचे विद्यार्थी नसतो तर आपण एखाद्या समस्येचे विद्यार्थी असतो.” म्हणून “ बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास” हा विषय निवडला आहे. या विषयाचा अभ्यास करताना ऐतिहासिक स्थळांकडे दुर्लक्ष न करता व अज्ञात ऐतिहासिक स्थळे, उपलब्ध साधनावरुन त्यांची योग्य ती मांडणी करणे. ही प्रस्तुत संशोधनातील समस्या आहे. म्हणून आजतागायत झालेल्या संशोधनाचा आढावा घेऊन नवीन माहिती उजेडात आणणे गरजेचे †ÖÆ.

संशोधन साहित्याचे परिशिलन:-

प्रस्तुत संशोधनासाठी “ बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास” µÖÖ ×¾ÖÂÖµÖÖÃÖ²Ö×¬ÖÝÖ माहिती बीड जिल्हा गॅझेट, डॉ,सतिष साळूंखे लिखित बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, नाथापुरी अब्दुल हमीद लिखित व अंन्सारी महंमद शफी (अनुवादीत) बीड जिल्ह्याचा इतिहास, मराठवाडा इतिहास परिषद स्मरणिका विशेषांक यांच्या ग्रंथातून बीड जिल्ह्यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

संशोधनाची उदिष्टये :-

1) बीड जिल्ह्याचा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास करणे.
2) बीड जिल्ह्यातील निवडक स्थळांचा शोध घेणे.
3) पुरातात्वीक दृष्टीकोनातून बीड जिल्ह्याचे महत्व जाणणे.
4) चिकित्सक व तुलनात्मक दृष्टीने बीड जिल्ह्यातील पुरातत्वाचा अभ्यास करणे.
5) किल्ले, गढी, वाडे, स्थापत्य व शिल्पकला यांच्या माध्यमातून राजकीय इतिहास अभ्यासणे.
6) बीड जिल्ह्यातील स्थळांचे धार्मिक व सांस्कृतिक महत्व स्पष्ट करणे.
7) बीड जिल्ह्यातील पुरातत्वाचा महाराष्ट्रातील इतर पुरातत्वीय स्थळासोबत तुलनात्मक अभ्यास करणे आणि मानवी जीवनात पुरातत्वाचे महत्व स्पष्ट करणे.

संशोधनाची गृहितके :-

1) बीड जिल्ह्यात किल्ला स्थापत्य आढळते.
2) बीड जिल्ह्याला पुरातत्वाचा प्राचीन ऐतिहासिक वारसा आहे.
3) बीड जिल्ह्यातील निवडक स्थळी विविध प्रकारच्या वास्तुंचे अवशेष आढळतात.
4) बीड जिल्ह्यातील निवडक स्थळी शिल्पकला आढळते.

5) बीड जिल्ह्यातील विविध स्थळांच्या सांस्कृतिक इतिहासात अनेक धर्माचे योगदान आहे.

6) बीड जिल्ह्यातील पुरातत्व विविध धर्माच्या प्रभावातून निर्माण झाले आहे.

7) बीड जिल्ह्यातील पुरातत्वावर प्रामुख्याने हिंदू धर्माची छाप दिसते.

संशोधन पध्दती :-

" बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास" या विषयावर संशोधन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पध्दतीमध्ये सर्वेक्षण पध्दत व वर्णनात्मक पध्दत तसेच संदर्भ पध्दत यांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच बीड, धारुर, अंबाजोगाई, धर्मापुरी या निवडक स्थळांचे सर्वेक्षण करुन उपयुक्त माहितीचे वर्णन व विश्लेषण या संशोधन कार्यात करण्यात येणार आहे. तसेच या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनाची प्रकरण निहाय मांडणी

प्रकरण पहिले

¯ÖÖÀ¾Ö³Ö´Öß

¯ÖÖÀ¾Ö³Ö´Öß Æ "बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास" µÖÖ ×¾ÖÂÖµÖÖ“Ö ¯Ö×Æ»Ö प्रकरण असून या प्रकरणात विषय निवड, उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पध्दती, संदर्भ साधने या बरोबरच या जिल्ह्यात ११ तालुके आहेत. त्यामध्ये बीड, गेवराई, वडवणी, आष्टी, पाटोदा, शिरुर कासार, माजलगाव, धारुर, केज, अंबाजोगाई व परळी हे आहेत तसेच या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,६९३ चौ.किलोमिटर आहे व या जिल्ह्याचे स्थान मध्य महाराष्ट्रात व मराठवाड्यात पश्चिम बाजुस आहे तसेच या जिल्ह्यावर राज्य करणाऱ्या राजघराण्यामध्ये सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, वाकाटक, कदंब, यादव, निजाम व इंग्रज इत्यादींनी राज्य केले आहे. तसेच बीड जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती इत्यादींचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

²Öß›

बीड या शहराला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. तसेच पुरातत्वाच्या दृष्टीकोनातून बीड शहरात व शहरालगतच्या परिसरात असणारी स्थळे व त्यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व हैद्राबाद मुक्ती संग्रामातील बीड शहराचे योगदान पुरातत्वीय दृष्टीकोनातून मांडणी करण्यात येणार †ÖÆê.

प्रकरण तिसरे

किल्ले धारुर

हे प्रबंधातील तिसरे प्रकरण नसून या ठिकाणी एक डोंगरी किल्ला आहे. या किल्ल्यावरुनच या शहराला किल्लेधारुर हे नाव पडले आहे. या किल्ल्याच्या बांधकामासाठी डोंगर दऱ्याखोऱ्याचा आधार घेण्यात आलेला आहे व हा किल्ला आदिलशाही सरदार ईश्वरखान लारी याने बांधला आहे. तसेच या ठिकाणी पुरातन वेस, मंदिरे, बारव, गढी, शिल्प इत्यादी स्थापत्य आढळतात आणि या नगराची स्थापना सन ८०६ मध्ये राष्ट्रकुट राजा गोविंद तृतीय याने केली आहे. धारुर हे राष्ट्रकुट कालीन नाव असून ते त्याकाळी विषय विभागाचे मुख्य ठिकाण होते. या शहराचे ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक, हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान व महत्व प्रतिपादन करुन किल्ले स्थापत्य व इतर वास्तुस्थापत्य यांचा सखोल अभ्यास किल्लेधारुर या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

अंबाजोगाई

मराठवाड्यातील शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून प्रसिध्द असलेले अंबाजोगाई हे बीड जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून ते एक महत्वपुर्ण स्थान आहे. अंबाजोगाई येथे राष्ट्रकुट, यादव, मोगल व ब्रिटीश कालखंडात अनेक वास्तु स्थापत्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे तसेच याठिकाणी मराठवाड्यातील अद्यकवी मुकुंदराज स्वामी यांची समाधी आहे. तसेच योगेश्वरी मंदिर, खोलेश्वर मंदिर, अमृतेश्वर मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर, जैन मंदिर, दासोपंथाची समाधी, हत्तीखाना अशी मंदिरे व गुहा मंदिर स्थापत्य व शिल्पस्थापत्य ही या परिसरात मोठ्या प्रमाणात आढळतात तसेच जैन, बौध्द, हिंदु ही गुहामंदिरे ही अंबाजोगाई येथे आढळून येतात.तसेच बारव व गढी, स्थापत्य, शिल्पस्थापत्य ही आढळते व या शहराचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील अंबाजोगाईचे योगदान व अंबाजोगाई परिसरातील स्थापत्य कलेचा व पुरातत्वाचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

¬ö´öö¯ö¸ß

धर्मापुरी हे बीड जिल्ह्यातील एक महत्वपुर्ण ऐतिहासिक ठिकाण असून या ठिकाणी चालुक्य राजा तिसरा सोमेश्वर यांच्या कारकिर्दीतील एक शिलालेख सापडला असून या शिलालेखात धर्मापुरीच्या तत्कालीन वैभवाचे वर्णन केले आहे. तसेच धर्मापुरी येथे किल्ला स्थापत्य, मंदिर स्थापत्य, बारव स्थापत्य, शिल्प

स्थापत्य असून त्याचबरोबर धर्मापुरी येथे मुबलक प्रमाणात अनेक शिल्प स्थापत्य ही आढळतात व हैद्राबाद मुक्ती संग्रामातील धर्मापुरी व परिसराचे योगदान तसेच राष्ट्रकुट राजांनी आपली राजधानी निर्माण केली होती. या विषयीची माहिती या प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष

"बीड जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास" या विषयाचे संशोधन एकूण ५ प्रकरणाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे. त्यात पार्श्वभूमी, बीड, किल्लेधारुर, अंबाजोगाई, धर्मापुरी या शहरांचा पुरातत्वीय दृष्टीकोनातून अभ्यास करुन जो निष्कर्ष समोर येणार आहे. तो या प्रकरणात मांडण्यात येईल. तसेच मी माझ्या प्रबंधाची मांडणी वरील सहा प्रकरणात करणार आहे. तथापि हा केवळ संशोधन आराखडा आहे. तो संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार संशोधन आराखड्यात किंवा प्रकरणाच्या शिर्षकात तसेच प्रकरणाच्या संख्येत बदल होऊ शकतो.

¯Öx¸x¿ÖÂ™ :-

यामध्ये बीड, किल्लेधारुर, अंबाजोगाई, धर्मापुरी येथील दुर्मिळ व नाविण्यपुर्ण असलेली मंदिर स्थापत्य, किल्लास्थापत्य, मुर्ती, शिल्पकला यांची छायाचित्रे आणि महत्वाचे शिलालेख तसेच नकाशे दाखवण्यात येणार आहेत.

ÃÖ¤³Ö ÃÖx“Ö :-

प्राथमिक साधने

अप्रकाशीत साधने

1) अंबाजोगाई शहर व परिसरातील पुरातत्वीय अवशेष.
2) ¬ÖÖ¹ý¸ü µÖ£ÖÖß»Ö ¯Ö¸ÖÜÖÜ¾ÖßµÖ †¾Ö¿ÖÂÖ.
3) ¬Ö´ÖÖ¯Ö¸üß µÖ£ÖÖß»Ö ¯Ö¸ÖÜÖÜ¾ÖßµÖ †¾Ö¿ÖÂÖ.
4) ²Öß› µÖ£ÖÖß»Ö ¯Ö¸ÖÜÖÜ¾ÖßµÖ †¾Ö¿ÖÂÖ.

शिलालेख :-

1) अंबाजोगाई - ६ शिलालेख
2) धर्मापुरी - ६ शिलालेख
3) बीड - २ शिलालेख

Ÿöö´ö¯ö™ :-

1) धारुर येथील राष्ट्रकुटकालीन ताम्रपट

दुय्यम साधने :-

1) डॉ.सतिश साळुंखे - बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास.

2) डॉ. कठारे अनिल व पवार शिवाजी : मराठवाड्यातील किल्ले, अल्फा पब्लिकेशन नांदेड, ¯ö£ö´ö †ö¾ö¢öß 2008

3) डॉ. अनिल कठारे व डॉ.विजया साखरे : मंदिरे आणि मुर्तीशिल्प, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती २००८

4) काळेगावकर ल.शा.: मनोहर अंबानगरी, मोहन प्रेस अंबाजोगाई १९६२.

5) पाठक अ.श. व काळे भगवान : किल्ले धारुर, संकेत प्रकाशन जालना, जानेवारी २००४.

6) बोरकर रा.रा.: पुरातत्वीय शोध नागपूर, कल्याण शिक्षण संस्था उन्मेश २००४.

7) Maharashtra State GAzetteers Bhir Dirstrict Maharashtra State Publication, Bombay 1969.

8) प्रा.काळे भगवान (संपादित) मराठवाडा : काल आणि आज, संकेत प्रकाशन जालना, ¯ö£ö´ö †ö¾ö¢öß ‹ú¯ö»ö 1988.

9) नाथापुरी अब्दुल हमीद लिखित व अंन्सारी महमंद शफी (अनुवादीत) : बीड जिल्ह्याचा इतिहास, मुंबई नाथापुरी पब्लिकेशन.

10) देगलूरकर गो.ब.: सुरसुंदरी, पुणे भारतीय विद्याभवन, सप्टेंबर २००४.

11) जोशी दिनकर : श्रीक्षेत्र अंबाजोगाई, कोल्हापूर, राजहंस प्रिटींग प्रेस तृतीय आवृत्ती जानेवारी 2008.

12) देव प्रभाकर : महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव काळे भगवान (संपा) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन, प्रथम आवृत्ती जानेवारी १९९८.

13) डॉ. पाठक अ.श.: धारुरचा किल्ला, भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधनाचे त्रैमासिक जुन २००९.

14) भालेराव अनंत : हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन, Ãö¯™ö¸ 1987.

15) देव शांताराम भालचंद्र : महाराष्ट्र व गोवे शिलालेख - ताम्रपटाची वर्णनात्मक संदर्भ सुचि, मुंबई शासकीय मुद्रण सामुग्री महाराष्ट्र राज्य १९८४.

16) डॉ.काटे पी.व्ही. : मराठवाड्याचा इतिहास, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती 1999.

17) घाणेकर प्र.के.: अथातो दुर्ग जिज्ञासा, पुणे स्नेहल प्रकाशन, तृतीय आवृत्ती २००५.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.विजया खूलासराव साखरे
(<´ö.<.,<´ö.<>.,<´ö.x±ú»ö., ¯öß<“ö.>ß.)
पदव्युत्तर इतिहास विभाग
श्री. शिवाजी कॉलेज कंधार
जि.नांदेड

संशोधक

घोगरे जयपाल विश्वनाथ
(<´ö.<.,²öß.<>., <´ö.x±ú»ö.)